**Q.P. Code:00002400**

[वेळ: ३ तास] [ गुण:१००]

**कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.**

**सूचना: १. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.**

**२. उजवीकडील आकडे पूर्ण गुण दर्शवतात.**

**3.अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.**

प्र.१ अ. आत्मकथन या साहित्य प्रकाराचे इतर साहित्यप्रकाराहून असणारे वेगळेपण साधार स्पष्ट करा. २०

**किंवा**

ब. दलित आत्मकथन ही संकल्पना स्पष्ट करणाऱ्या व्याख्या देऊन दलित आत्मकथन लेखनामागील प्रेरणा व त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

प्र.२ अ. ‘मन में है विश्वास’ या आत्मकथनातील विश्वास नांगरे-पाटील यांनी स्पर्धा परीक्षेसाठी केलेल्या तयारीचा आढावा तुमच्या शब्दात घ्या. २०

**किंवा**

ब. लेखक विश्वास नांगरे-पाटील यांच्या भावजीवनातील ‘गाव आणि गोतावळा’ चे चित्रण तुमच्या शब्दात करा.

प्र.३ अ. ‘जसं घडलं तसं’ या आत्मकथनातील आशय तुमच्या शब्दात सांगा. २०

**किंवा**

ब. ‘जसं घडलं तसं’ या आत्मकथनातील ताराचे भावजीवन उलघडून दाखवा.

**प्र.४** प्रत्येक गटातील **एक टीप लिहा.** ३०

अ. 1. आत्मकथन : एक गद्यात्मक साहित्यप्रकार

**किंवा**

2. दलित आत्मकथनाची वैशिष्ट्ये

ब. 1. ‘मन में है विश्वास’ मधील शिक्षकांची भूमिका

**किंवा**

2. ‘मन में है विश्वास’ मधील लेखकाच्या शाळेतील आठवणी

X0279Y2CA259X0279Y2CA259X0279Y2CA259X0279Y2CA259

**Q.P. Code:00001654**

क. 1. ‘जसं घडलं तसं’ आत्मकथनातून येणारे स्त्रियांचे भावविश्व २०

**किंवा**

2. ‘जसं घडलं तसं’ आत्मकथनातील ताराची आई

प्र.५. एका वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही पाच)** १०

१. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या आत्मचरित्राचे नाव सांगा?
२. 'मन मैं है विश्वास'-आत्मकथनात नमूद केल्याप्रमाणे गावात आलेल्या आधुनिक करमणुकीच्या साधनाच्या अतिरेकाचा पहिला बळी कोण ठरतो?
३. 'मेकर टॉवर' या लायब्ररीचा शिपाई लेखकाची हेटाळणी करण्यासाठी कोणती 'म्हण' वापरतो?
४. “विठ्ठलाचा रंग, पिळदार स्नायूचे शरीर, राकट चेहरा व बेरकी आवाज, मराठी सिनेमातल्या खर्जातल्या खलनायकासारखी दिसणारी ही व्यक्तिरेखा कमालीची हळवी व भावनाशीर होती”, असे वर्णन विश्वास नांगरे पाटील यांच्या कोणत्या मित्राचे आले आहे?
५. डोक्यावरचा पटका आणि काळा कोट' अशी बाह्य प्रतिमा लेखिका नीलम माणगावे यांच्या मनात कोणाची होती?
६. 'जसं घडलं तसं' मध्ये 'तारेखाली तिळगूळ वाटप सुरू आहे. सगळ्यांनी तिळगूळ घेऊन गोड बोलावे' असे कोणाला चिडवले जात असे?
७. 'जसं घडलं तसं' मध्ये शाळेतून घरी आल्यानंतर फ्रॉक काढून तो दिवळीत ठेवण्याचा ताराच्या घरातील प्रघात कशाचा संकेत होता?
८. नीलम माणगावे यांचे आजोबा जिवंत असताना वाड्यातील बायका कशाशिवाय घराबाहेर जात नसत?